आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१९ मार्च २०२६ - गुरुवार

**<u>ठळक बातम्या</u>**

- गुढीपाडव्याच्या नववर्ष स्वागत यात्रांचा राज्यात सर्वत्र उत्साह

- राज्यातल्या प्रत्येकाच्या जीवनात सकारात्मक परिवर्तन घडवून आणण्याचा मुख्यमंत्र्यांचा संकल्प

- मध्यम, लघु आणि सूक्ष्म उद्योगाचं संरक्षण सिद्धतेत महत्त्वाचं योगदान असल्याचं संरक्षण मंत्र्यांचं प्रतिपादन

**आणि**

- चीनमधले भारताचे राजदूत म्हणून विक्रम दोराईस्वामी यांची नियुक्ती

**<><><><><>**

चैत्र शुद्ध प्रतिपदा अर्थात गुढीपाडवा हा वर्षारंभाचा सण आज राज्यात सर्वत्र उत्साहाने साजरा होत आहे. नववर्षाचा प्रारंभ देवदर्शनाने करण्यासाठी शहरातल्या मंदिरांमधे पहाटेपासून रांगा लागल्या आहेत. घरोघरी रेशमी वस्त्र आणि कलश धारण केलेल्या गुढ्या उभारुन त्यांची पूजा करण्यात आली. मिष्टान्नाचं भोजन करण्याची प्रथा असल्यानं मिठाईच्या दुकानांमधे गर्दी झाली आहे. साडेतीन मुहूर्तातला वर्षातला हा पहिलाच मुहूर्त साधून सोनं चांदी, आणि मौल्यवान वस्तूंची खरेदी होत आहे.

रस्त्यांवरच्या शोभिवंत रांगोळ्या,झेंडूच्या फुलांची सजावट, रंगीबेरंगी पारंपरिक पोषाख, सामाजिक संदेश देणारे फलक आणि चित्ररथ तसंच वाजत गाजत केलेल्या करतब कसरती हे गुढीपाडव्याच्या शोभायात्रांचं वैशिष्ट्य. ढोल, लेझीम लाठीकाठी, मल्लखांब अशा खास मराठी खेळांचं दर्शन या शोभायात्रांमधून घडत आहे.

मुंबईत गिरगाव इथं पारंपरिक वेश भूषेत तरुणांनी बाईक रॅली काढली. ढोल आणि लेझीम पथकांच्या कवायती, मर्दानी खेळांची प्रात्यक्षिकं आणि मनोरंजन जगतातल्या अनेक मान्यवरांचा सहभाग हे स्वागतयात्रेचं वैशिष्ट्य होतं. भरजरी पोषाख, दिमाखदार फेटे आणि वाद्यमेळाने गिरगावातले प्रमुख रस्ते फुलून गेले होते.

मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज नागपूरमधे नववर्ष स्वागत यात्रेत सहभागी झाले. देश आधुनिकतेकडे वाटचाल करत असताना तरुणाई परंपरा जपत असल्याचा आनंद त्यांनी व्यक्त केला. राज्याला पुढे नेण्याचा आणि राज्यातल्या प्रत्येक नागरिकाच्या जीवनात सकारात्मक बदल घडवण्याचा संकल्प नवीन वर्षप्रारंभानिमित्त केल्याचं फडणवीस यांनी यावेळी सांगितलं…

**होल्ड- बाईट- देफ**

ठाणे शहरात कौपिनेश्वर मंदिर समितीच्या वतीनं आयोजित स्वागत यात्रेत उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे सहभागी झाले होते. विविध समुदायांच्या लोककलांचं सादरीकरण या यात्रेत करण्यात आलं.

डोंबिवलीमधे खासदार श्रीकांत शिंदे यांच्या संकल्पनेवर आधारित ऐतिहासिक इमारतींच्या आणि विकासप्रकल्पांच्या प्रतिकृती साकारणारे चित्ररथ स्वागतयात्रेचं आकर्षण ठरले.

गुढीपाडव्यानिमित्त हंगामातल्या हापूस आंब्याचं स्वागत आज नवी मुंबईच्या मार्केट यार्डमधे झालं.

रत्नागिरी मधे शोभायात्रेचं हे २२वं वर्ष होतं. ग्राममंदिर ते समाजमंदिर अशी यंदाची संकल्पनाहोती. सांगलीत विविध कार्यक्रमांसह हिंदुस्तानी शास्त्रीय संगीताच्या कार्यक्रमाचं आयोजन करण्यात आलं होतं. बुलढाणा जिल्ह्यात खामगाव इथं वृक्षारोपणाने मवीन वर्षाचं स्वागत करण्यात आलं.

<><><><><>

गुढीपाडव्याप्रमाणेच चैत्र शुक्लादि, उगादी, चेटी चंड, नवरेह आणि साजिबू चेरोबा, हे सण देशाच्या विविध भागात आज साजरे होत आहेत. नवीन वर्षाच्या आणि वसंताच्या आगमनाचे हे उत्सव रबी हंगामातल्या सुगीचा सोहळा असतात. राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी देशवासियांना या सणाच्या शुभेच्छा दिल्या आहेत. हे सण म्हणजे भारताच्या समृद्ध सांस्कृतिक विविधतेचं प्रतीक असल्याचं त्यांनी म्हटलं आहे.

उपराष्ट्रपती सी पी राधाकृष्णन, प्रधानमंत्री नरेंद्र मोदी यांनीही जनतेला या सणांनिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत. चैत्रीनवरात्राचा प्रारंभ आज होत असून त्यानिमित्तही प्रधानमंत्र्यांनी शुभेच्छा दिल्या आहेत. महाराष्ट्रातल्या जनतेला गुढीपाडव्याच्या शुभेच्छा देणारं विशेष पत्र त्यांनी लिहीलं आहे.

राज्यपाल जिष्णुदेव वर्मा यांनीही राज्यातल्या जनतेला गुढीपाडव्यानिमित्त शुभेच्छा दिल्या आहेत.

<><><><><>

राष्ट्रपती द्रौपदी मुर्मू यांनी आज अयोध्येतल्या राम मंदिरात विशेष धार्मिक विधीचा भाग म्हणून दीडशे किलो वजनाचं सोन्याचा थर चढवलेलं ‘श्रीराम यंत्र’ स्थपित केलं. राष्ट्रपतींनी हे यंत्र मंदिराच्या दुसऱ्या मजल्यावरच्या गर्भगृहात विधिवत पूजा अर्चनेनंतर आणि मंत्रोच्चारांसह स्थापित केलं. यावेळी उत्तर प्रदेशाच्या राज्यपाल आनंदीबेन पटेल तसंच मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ उपस्थित होते.

<><><><><>

सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग हे देशाच्या संरक्षण उत्पादन क्षेत्राचे महत्वाचे आधारस्तंभ म्हणून उदयाला येत आहेत असं प्रतिपादन संरक्षण मंत्री राजनाथ सिंह

यांनी आज केलं.  नवी दिल्लीत राष्ट्रीय संरक्षण उद्य़ोग परिषदेत ते बोलत होते. भारताची तंत्रज्ञान क्षमता वाढवण्याच्या दृष्टीने  स्टार्टअप, नवोद्योजक आणि संशोधक महत्वाची भूमिका बजावत असल्याचं त्यांनी यावेळी सांगितलं.

**होल्ड बाईट**

डिफेन्स एक्सलन्स मंच या पोर्टलमुळे अनेक संशोधक आणि नवोद्योजकांना संरक्षण क्षेत्रामध्ये थेट योगदान देण्याची संधी मिळाली असं त्यांनी नमूद केलं. संरक्षण उद्योगाचा अवजड मुख्य भाग तसंच सर्वसमावेशकता साधणे याबाबत सरकार वचनबद्ध आहे तर सुक्ष्म, लघू आणि मध्यम उद्योग, स्टार्टअप आणि युवा उद्योजक हे भारताच्या संरक्षण क्षमतेच्या भविष्याला आकार देण्याच्या बाबतीत महत्वाची भूमिका बजावू शकतील असही सिंग यांनी अधोरेखीत केलं.

**<><><><><>**

चीनमधले भारताचे राजदूत म्हणून विक्रम दोराईस्वामी यांची नियुक्ती झाली आहे. दोराईस्वामी हे १९९२  च्या भारतीय परराष्ट्र सेवेतले अधिकारी  असून सध्या ते युनायटेड किंगडम मधे उच्चायुक्त म्हणून कार्यरत  आहेत. भारत आणि चीनमधले द्विपक्षीय संबंध सुधारण्याच्या दृष्टीने दोराईस्वामी यांची नियुक्ती महत्त्वाची मानली जात आहे.  दोराईस्वामी प्रदीप कुमार रावल यांची जागा घेतली.

**<><><><><>**

राष्ट्रीय महामार्गांवरच्या टोल संकलनात पारदर्शकता आणि सुगमता रहावी याकरता केंद्रसरकारने राष्ट्रीय महामार्ग नियमांच्या सुधारणेची अधिसूचना जारी केली आहे. यामुळे गुंतवणूकदारांचा विश्वास  तसंच कायदेशीर आर्थिक संरक्षण वाढेल असं या नियमात म्हटलं आहे. टोल चुकवणाऱ्यांकडून वसुली, ई नोटीस एसएमएसद्वारे पाठवण्याची  सुविधा,याबरोबरच टोल दात्यांच्या तक्रारींचं निवारण करण्यासाठी वेगळं पोर्टल इत्यादी नवीन बाबींचा समावेश या नियमांमधे केला आहे.

**<><><><><>**

पश्चिम आशियात सुरू असलेल्या संघर्षाबद्दल सरकार सजग असून भारतीय निर्यातदारांना दिलासा देण्यासाठी योग्य पावलं उचलत आहे, असं प्रतिपादन परकीय व्यापार महासंचालक लव अग्रवाल यांनी आज केलं. नवी दिल्लीत वार्ताहर परिषदेला ते संबोधित करत होते. पश्चिम आशियातल्या परिस्थितीच्या पार्श्वभूमीवर सरकारनं निर्यातदारांसाठी दिशानिर्देश जारी केल्याची माहितीही त्यांनी दिली.

<><><><><>

पश्चिम आशियामध्ये एअर इंडिया आणि एअर इंडिया एक्स्प्रेस या विमानकंपन्यांच्या एकूण अठ्ठेचाळीस विमानउड्डाणे आजपासून सुरु होतील.  या दोन्ही कंपन्यांची  जेद्दा आणि मस्कतमध्ये नियमित विमानसेवा सुरु राहिल.  एअर इंडियाची विमाने  दिल्ली आणि मुंबई पासून तर एअर इंडिया एक्स्प्रेसची विमाने बंगळुरू, हैदराबाद आणि कोझिकोळ्ळ इथून निघतील.

<><><><><>

सिंधुदुर्ग पोलीस दल सक्षम आणि आधुनिक बनवण्याच्या उद्देशाने २८ अत्याधुनिक वाहनांचं लोकार्पण आज जिल्ह्याचे पालकमंत्री नितेश राणे आणि गृह राज्यमंत्री डॉ. पंकज भोयर यांच्या हस्ते झालं. पर्यटनाच्या दृष्टीने सिंधुदुर्ग हा महत्त्वाचा जिल्हा असून सागरी सुरक्षेसाठी सीसीटीव्ही व्यवस्था अधिक सक्षम करण्यात येईल, असं आश्वासन डॉ. पंकज भोयर यांनी यावेळी दिलं.

<><><><><>

एचडीएफसी बँकेचे अध्यक्ष अतनु चक्रवर्ती यांनी कार्यकाळ संपण्यापूर्वीच पदाचा राजीनामा दिला आहे. बँकेत गेल्या २ वर्षात झालेल्या घडामोडी आणि कार्यपद्धती आपल्या व्यक्तिगत  नीतीमूल्यांच्या विरोधात होत्या, असं कारण चक्रवर्ती यांनी दिलं आहे. त्यांचा कार्यकाळ मे २०२७मधे संपणार होता. चक्रवर्ती यांच्या राजीनाम्यामुळे रिक्त झालेल्या अध्यक्षपदावर माजी मुख्य कार्यकारी

अधिकारी केकी मेस्त्री यांची तात्पुरती नेमणूक करायला रिझर्व बँकेनं मंजुरी दिली आहे.

**<><><><><>**

ठाणे जिल्ह्यात भिवंडी जवळ कशेळी पूलाजवळच्या फर्निचर गोदामांमध्ये आज सकाळी आग लागली. भिवंडी, ठाणे, कल्याण इथले अग्निशामक बंब घटनास्थळी दाखल झाले. सकाळी साडेअकराच्या सुमाराला लागलेल्या आगीत तीन ते चार गोदामं जळून गेल्याचं अग्निशमन विभागाच्या अधिकाऱ्यांनी सांगितलं.

**<><><><><>**

सातारा शहरासह तालुक्यातील विविध भागात मेघगर्जनेसह जोरदार पावसाने हजेरी लावली. जिल्ह्याच्या इतर भागातही पाऊस होत आहे.

//<><><><><>//